# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३५९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–२७/०६/२०१६.

**१) गैरकायदयाची मंडळी जमवून युवकाला जिवानिशी ठार मारले. :–**

दिनांक २५/६/२०१६ रोजी २३.०० वा. ते दि.२६/६/२०१६ रोजी ०३.०० वा. फिर्यादी सौ. गुनाज सोनु मेश्राम वय २० वर्ष रा. नेहरू वार्ड वरठी हिने मृतक सोनु कृष्णा मेश्राम रा. वरठी याच्या सोबत हत्तीडोई पाहाडी येथे बौध्द पध्दतीने लग्न करून त्याच्या घरी राहत होती. फिर्यादीचा भाऊ व नातेवाईक असे सहा आरोपी यांनी महार जातीच्या मुलासोबत झालेल्या लग्नाला विरोध दर्शवून गैर कायदयाची मंडळी जमवून मृतकाच्या घरा समोर जावुन मृतकाला बाहेर बोलावुन कोणत्यातरी धारदार शस्त्राने त्याच्या गळयावर, डोक्यावर मारून गंभीर जखमी करून जिवानिशी ठार केले. असे फिर्यादिचे तोंडी रिपोर्ट वरून व मर्गच्या कागदपत्रावरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १४३,१४७,१४८,१४९,३०२ भादंवी सहकलम ३(२)(५) अ.जा.ज.अ.प्र. कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास उपविभागीय पोलीस अधिकारी तुमसर श्री. साळी हे करीत आहेत. सदर गुन्हयातील तिन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

**२) ट्रक मधील सामानाची चोरी. :–**

दिनांक २५/०६/०१६ रोजी २२.०० वा. ते दि. २६/०६/०१६ रोजी ०८.०० वा. पर्यंत आर.एफ.ओ. पार्कीग यार्ड मधील उभ्या असलेल्या ट्रकचे १० नग स्टेपनी ,टायर, टयुब व डिक्ससह कि. १,८५,०००/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने ट्रक खोलुन ट्रक मधुन चोरून नेला. असे फिर्यादी जावेद मशजिद खान वय ३८ वर्ष, रा. कामठी जि. नागपुर यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास सफौ. संतापे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) पैसे खर्च करून विश्वासघात केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २५/०६/२०१६ रोजी २२.१५ वा. दरम्यान आरोपी याला ट्रक मालक याने भाडयाच्या पैस्याबाबत विचारणा केली, यावरून आरोपीने फिर्यादीला ४०००/–रु. नगदी देवुन बाकी १२,०००/–रु. माझ्याकडे नाही ते खर्च झाले, असे सांगुण आरोपीने फिर्यादीचा विश्वासघात केला. असे फिर्यादी सुशील मनोहरलाल शर्मा वय ४२ वर्ष, रा. किसान नगर खात रोड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४०८ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास सपोनी. किचक पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) अवैध दारू अडयांवर धाडी. :–**

दिनांक २६/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. गोबरवाही व पवनी येथील परीसरातील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २५ लिटर हातभट्टी दारू कि. १२५०/–रू. व ९०० मिली. देशी दारू कि. २५०/–रू. असा एकुण कि. १५००/–रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२० O/C

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.